महाराष्ट्र वस्तु व सेवाकर विभाग
राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय.
८ वा मजला, नवीन इमारत, वस्तु व सेवाकर भवन, माझगांव, मुंबई - ४०० ०१०.

संदर्भ:-

१) आदेश क्र. विविआ / २०१७/ आस्था-३ / पुनर्रचना कक्ष / प्रशासकीय बदल / प्र. क्र. ९२ मुंबई दि. २८/०४/२०१७
२) शुध्दीपत्रक क्र. विविआ / २०१७/ आस्था-३ / पुनर्रचना कक्ष / प्रशासकीय बदल / प्र. क्र. ९२ मुंबई दि. १६/०५/२०१७
३) समक्रमांकीय आदेश दि. १२.०७.२०१७, दि. १२.०६.२०१८.
४) शासन निर्णय वित्त विभाग क्र. विकवि १२१९/प्र.क्र. ०२/वि.प्र.४ दि. २५.०२.२०२०.
५)

## कार्यालयीन आदेश

क्र. विविआ / २०१७/ आस्था-३ / पुनर्रचना कक्ष / प्रशासकीय बदल / प्र. क्र. ९२ मुंबई दि. 05 MAY 2022

**प्रस्तावना**

उपरोक्त संदर्भ क्र. १ च्या आदेशान्वये मुंबई व पुणे येथील नोडल विभागांच्या प्रशासकिय संरचनेत बदल करण्यात आले होते. त्यानुसार नोडल विभागातील काही राज्यकर उपायुक्तांना प्रशासकीय राज्यकर उपायुक्त म्हणुन तर काही राज्यकर उपायुक्तांना राज्यकर उपायुक्त अपिले म्हणुन अनुक्रमे प्रशासकीय व अपिल विषयक कामाची पुर्णवेळ जबाबदारी देण्यात आली होती.

त्यानंतर पुणे नोडल विभागात इतर विभागातील राज्यकर अधिकारी यांचे स्थानांतरण प्रशासकीय कारणास्तव करण्यात आले होते. त्यामुळे पुणे नोडल विभागातील एका प्रशासकीय राज्यकर उपायुक्त यांना साधारणपणे 50 ते 55 सहायक राज्यकर आयुक्त / राज्यकर अधिकारी यांच्यावर प्रशासकीय नियंत्रक अधिकारी म्हणून काम करावे लागत होते. त्यामुळे त्या राज्यकर उपायुक्तांना प्रशासकीय राज्यकर उपायुक्त म्हणुन काम करणे अवघड व जिकीरीचे झाले होते. ही बाब विचारात घेवून तात्कालीन अपर राज्यकर आयुक्त, पुणे क्षेत्र, पुणे यांनी त्यांच्या स्तरावर पुणे नोडल विभागातील सर्व राज्यकर उपायुक्तांना नोडल विषयक कामाबरोबरच सहायक राज्यकर आयुक्त / राज्यकर अधिकारी यांच्यावर प्रशासकीय नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी दिलेली होती. या प्रशासकीय बदलास मान्यता मिळावी असा प्रस्ताव अपर राज्यकर आयुक्त, पुणे क्षेत्र, पुणे यांनी सादर केला आहे.

त्यास अनुसरून खालीलप्रमाणे सुधारीत निर्देश व कार्यवाहीचे आदेश देण्यात येत आहेत.

पुणे नोडल विभागातील प्रशासकीय संरचनेत बदल करुन सर्व राज्यकर उपायुक्त यांना नोडल विषयक कामाबरोबरच सहायक राज्यकर आयुक्त / राज्यकर अधिकारी यांच्या प्रशासकीय नियंत्रणाचे काम देण्यात यावे.

वरील बदलांमुळे खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

1. संदर्भ क्र. २ च्या शुध्दीपत्रकान्वये घोषित करण्यात आलेल्या पुणे नोडल विभागातील प्रशासकीय उपायुक्त यांना देखील नोडल विषयक काम देण्यात येत असल्याने व्यापाऱ्यांचे फेरवाटप करण्यात यावे. प्रकरणांचे फेरवाटप बाबत कार्यवाही अपर राज्यकर आयुक्त, पुणे क्षेत्र, पुणे यांनी महाविकास शाखेशी समन्वय साधून करावी.
2. अपर राज्यकर आयुक्त, पुणे क्षेत्र, पुणे यांनी नोडल विभागातील सहायक राज्यकर आयुक्त / राज्यकर अधिकारी यांचे संबंधित प्रशासकिय नोडल राज्यकर उपायुक्त व त्यावरील पदशृंखलेचा (Hierarchy) आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करुन महाविकास शाखेस या कार्यालयाच्या माहितीने सादर करावा, जेणेकरुन अधिकाऱ्यांना नेमुन दिलेले व्यापारी व नियंत्रक अधिकाऱ्यांची पदशृंखला संगणक प्रणालीवर स्थापित करणे शक्य होईल.

या आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

(राजीव कुमार मित्तल)
राज्यकर आयुक्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत -

१) विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२) अपर पोलीस महासंचालक व मुख्य दक्षता अधिकारी, महाराष्ट्र राज्य मुंबई.

३) अप्पर राज्यकर आयुक्त, मुंबई- १, २ व ३ व्यवसायकर/ठाणे/नाशिक/कोल्हापुर/नागपुर/ठाणे.

४) सर्व राज्यकर सहआयुक्त.

५) राज्यकर सहआयुक्त (महाविकास), यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी

६) आयुक्तांच्या कार्यालयातील सर्व कार्यासने

७) निवडनस्ती

८) स्थळप्रत.